ISSN : 2278-9308

# Sanshodhan Samiksha

Humanities, Social Sciences, Commerce,
Education, Law and Language
Monthly Peer Reviewed International Research Journal

**Special Issue June - 2016**




☐ Chief Editor - Prof. Virag S. Gawande
☐ Editor - Dr. Sanjay J. Kothari
Editor - Dr. Dinesh W.Nichit

**- PUBLISHED BY -**

AADHAR SOCIAL RESEARCH & DEVELOPMENT TRAINING INSTITUTE, AMRAVATI, MS.

| | | | |
|---|---|---|---|
| 29 | प्रा. डॉ. माधव मारुती भोसले | फेसबुक आणि मराठी कविता | 16 |
| 30 | प्रा.कदम संभाजी धोंडीराम | संत तुकारामांच्या अभंगातील समाजप्रबोधन | 21 |
| 31 | प्रा. डॉ. विशाखा वंजारी | आशा बगे यांच्या 'भूमी' कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन | 28 |
| 32 | प्रा.लीना केदारे | जागतिकस्त्रीवादी समीक्षक | 34 |
| 33 | मंगेश अशोकराव रणदिवे, | गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेवरील आघाडी सरकारांचा प्रभाव : एक चिकित्सक अध्ययन | 39 |
| 34 | प्रा. डॉ. विजय रैवतकर | विजय तेंडुलकरांच्या नाटकांतील वाङ्मयीन विद्रोह | 43 |
| 35 | कु.कविता निरंजन खरात | मानवाधिकार व पाली साहित्यातील स्त्री शिक्षण | 46 |
| 36 | प्रा. वर्षा गणगणे | महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती आंदोलने आणि चळवळी | 49 |
| 37 | प्रा. तिलकचंद जि. धोटे | जागतिक तापमान वाढ व हवामानातील बदल | 54 |
| 38 | प्रा. मोनिका एन.मानापूरे<br>प्रा. डॉ.एन.आर.दिक्षित | वर्धा शहरातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखांनी गृह निर्माण कर्जाच्या संदर्भात केलेल्या कार्याचे मुल्यमापन | 58 |
| 39 | डॉ. वंदना पळसापुरे | देशीवाद आणि मराठीतील स्त्रियांचे कादंबरीलेखन | 61 |
| 40 | प्रा.शिल्पा नेवे | वारकरी संतसाहित्यातील तत्वज्ञान | 64 |
| 41 | प्रा. मनोहर एस. कलोडे<br>डॉ.धनंजय विरुळकर | विदर्भातील आश्रमशाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता विशिष्ट शारीरिक क्षमता चाचणीची निर्मिती आणि प्रमाणिकरण – एक अभ्यास | 69 |
| 42 | प्रा.डॉ. वाय.एम. साळूंके | रविंद्रनाथ टागोरांचे शिक्षणविषयक विचार व कार्य | 72 |
| 43 | प्रा. उत्तम करमाळकर | प्राचार्य शिवाजीवराव भोसले यांच्या वैचारिक जगतातून मानवी हक्काचे दर्शन | 76 |
| 44 | प्रा. डॉ. पद्माकर मा. टाले | पाणी व्यवस्थापन - काळाची गरज | 81 |
| 45 | प्रा. जी. डी. रूपवते, | कॉ. माधवराव गायकवाड यांचे कामगार व शेतकरी या घटकांविषयीचे योगदान | 84 |
| 46 | प्रा. विनोद यू. भालेराव | कथाकार शंकर पाटील | 86 |
| 47 | प्रा.शोभा संभोजी | स्त्रीभ्रूणहत्या : 21 व्या शतकातील आव्हान | 88 |
| 48 | प्रा. डॉ. सौ. यु.आर.पाटील | केतकरांच्या कादंबरीतील मिश्रविवाहः एक दृष्टिक्षेप | 92 |
| 49 | प्रा. व्ही. एस. यादव | डॉ. आंबेडकर आणि भारतीय लोकशाही | 96 |
| 50 | प्रदीप औजेकर, | दत्त संप्रदायः वाङ्मय व स्वरूप | 99 |
| 51 | डॉ. निलेश र.निंबाळकर | मानवी हक्क आणि भारतीय व्यवस्थेसमोरील आव्हाने | 103 |

ISSN - 2278-9308

# रविंद्रनाथ टागोरांचे शिक्षणविषयक विचार व कार्य

प्रा.डॉ. वाय.एम. साळूंके
म.वि.प्र. समाजाचे कला,विज्ञान,व वाणिज्य महाविद्यालय ओझर (मिग) जि.नाशिक

---

रविंद्रनाथ टागोर हे थोर शिक्षणतज्ज्ञ व विचारवंत होते. ते त्यांनी लिहिलेल्या " गीतांजली " या काव्यसंग्रहाद्वारे जगप्रसिध्द झाले. त्यानी निसर्गवादाची तत्वे शिक्षणाच्या माध्यमातून साकार केली आहेत. गीतांजली या काव्यग्रंथाबद्दल त्यांना १९१३ रोजी साहित्यातील नोबेल पारितोषिक मिळाले. परमेश्वरास त्यांनी सर्वोच्च स्थान दिले होते. परमेश्वरास त्यांनी सर्वोच्च व्यक्ती म्हणून स्थान दिले. ते निसर्गवादी, आदर्शवादी सुध्दा होते. त्यांच्यामध्ये धार्मिक विचाराबरोबरच मानवी विचाराला महत्त्व देणारे एक महमानव होते. ते एक महाकवी व विचारवंत होते. त्यांनी नाट्य, चित्रकला, नृत्य या क्षेत्रातही विशेष उल्लेखनीय कार्य केले.त्यात महत्तवाचे म्हणजे शिक्षणाविषयी भारतीय जनतेत अमुल्य विचार मांडून त्यांनी जागृती निर्माण केली.

**शिक्षण प्रक्रियेत विद्यार्थ्यांना पूर्ण स्वातंत्र्य देणे.**

रविंद्रनाथ टागोर घरी आणि शाळेत शिकत असतांना तेथील वातावरण त्यांना गुरांच्या कोंडवाडयाप्रमाणे वाटत असे. त्यामुळे त्यांचे लक्ष शिक्षणाकडे लागत नव्हते. या विचारसरणीतून त्यांचे विचार बदललेले दिसतात. त्यांना वाटते की, मुलांना शिक्षण निसर्गाच्या सान्निध्यात दिले पाहिजे. अध्ययन करण्यासाठी मुलांना पूर्ण स्वातंत्र्य असावे. यासाठी त्यांनी कोलकात्यापासून दूर असलेल्या बोलपूर या गावी शांतीनिकेतन या नावाने शाळा स्थापन केली. ती निसर्गरम्य वातावरणात होती. अध्ययन अध्यापन प्रक्रियेच्या समर्थनार्थ ते याच शाळेचे उदाहरण देतात. याविषयी रविंद्रनाथ टागोर म्हणतात. बालकांना अध्ययनासाठी वातावरण निर्मिती करणे हे नेहमी माझ्या मनात होते. वर्गखोलीत अध्यापन करण्यापेक्षा खुल्या वातावरणात करणे जास्त सोयीस्कर होते

मुलांना अध्ययनासाठी नैसर्गिक मार्गांचा अवलंब केला पाहिजे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात स्वातंत्र्य व संवेदनशीलता आणण्यासाठी मदत मिळू शकते. नैसर्गिक वातावरणात बालक उत्तम प्रकारे अध्ययन करु शकेल. म्हणून अध्यापन पध्दती अशा नैर्सगिक वातावरणातून दिली पाहिजे. यावर रविंद्रनाथ टागोरांचा भर होता.

**मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण**

शिक्षणातून विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकास व्हावा असे रविंद्रनाथ टागोरांना वाटत असे. मानसिक, नैतिक, शारीरिक, बौध्दिक विकास करण्यासाठी त्यांच्यातील समतोल साधणे गरजेचे असते. मानवप्राणी आणि निसर्ग यांच्याशी विद्यार्थ्यांना सुसंवाद साधण्यासाठी शिक्षणात तरतूद असावी. शिक्षण हे परस्परात सुसंवाद साधण्यासाठी एक प्रभावी साधन असते. यानुसार विद्यार्थी आणि समाज यांच्यामध्ये निसर्गसान्निध्यात शिक्षणाने सुसंवाद साधून विकसित करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. त्यामुळे विद्यार्थी निसर्गाचा मनमुराद आनंद लूटून अध्ययनाकडे सहजगत्या आकृष्ट होऊ शकेल असे रविंद्रनाथ  टागोरांचे मत होते. यामुळे विद्यार्थ्यांच्या विकासास चालना मिळेल.

**मुलांच्या मानसिक स्वातंत्र्यासाठी शिक्षण**

रविंदनाथ टागोरांना विद्यार्थी शिक्षणात पारंपारिक पध्दतीचा वापर करण्यास विरोध होता. त्यात आमूलाग्र बदल असावा. असे त्यांना वाटे. ते स्वतः आध्यात्मवादी असल्याने आध्यात्मिक शिक्षणाकडे त्यांचा कल दिसून येतो. रविंद्रनाथ टागोरांच्या मते मानवी जीवनाचे उच्चतम उद्दिष्ट म्हणजे खुल्या वातावरणात आत्म्याचा विकास होऊन त्या माध्यमातून त्याचा पूर्णतया विकास घडून येतो. यावरून मुलांचा आत्मिक विकास घडवून आणण्यासाठी नैर्सगिक वातावरणात शिक्षण दिले पाहिजे. असे दिसून येतो.

**शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे**

शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे यावर रविंद्रनाथ टागोर यांचा भर दिसतो. कारण मातृभाषेतून शिकल्यामुळे कोणता लाभ होतो हे त्यांनी स्वतः अनुभवले होते. या अनुभवातूनच त्यांचे मत तयार झाले होते की, शिक्षण बालकाच्या

ISSN - 2278-9308

मातृभाषेतून दिल्यास त्यास योग्य प्रकारे समजण्यास मदत होते. मातृभाषा शिक्षणाचे माध्यम असल्याने बालकाच बुद्धीला चांगली चालना मिळू शकते. मातृभाषेतून इतर विषय शिकण्यास सुलभ होते. इंग्रजीसारख्या परकीय भाषेतून शिकण्यास अडचण निर्माण होऊ शकते. इतर विषय पूर्णपणे समजण्यास बराच कालावधी लागू शकतो. म्हणून शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असण्यावर रविंदनाथ टागोरांचा विचार त्यांची दूरदृष्टी दिसून येते.

**अध्यापनात स्वयंशिस्तता असली पाहिजे**

मुलांना शिकवितांना शिस्तीचे पालन करणे गरजेचे ठरते. अध्यापन करीत असताना शिस्त राखणे काही कठीण काम नाही. परंतू शिकवित असतांना मुलांना स्वातंत्र्य देऊन त्यांच्यावर विश्वास प्रकट केल्यास बेशिस्तीला थारा उरत नाही. म्हणून अध्यापन करीत असताना मुलांवर बाहेरुन शिस्तीचा बडगा उगारण्यापेक्षा शिक्षकाने स्वयंशिस्तीवर भर द्यावा यावर रविंदनाथ टागोरांचा विश्वास दिसतो. रविंद्रनाथ टागोरांनी अनुसरलेल्या शैक्षणिक प्रयोगात बेशिस्त बोकाळण्याची कारणे म्हणजेच मुलांना समजून घेण्यात केलेली चूक ही होय असे टागोरांचे मत आहे. म्हणून मुलांच्या विकासाबरोबर शिस्तीचा विचार होणे गरजेचे ठरते. म्हणून बाहेरुन शिस्त लादण्यापेक्षा स्वयंशिस्तीवरच अधिक भर दिला जावा या मताचा टागोरांनी पुरस्कार केल्याचे प्रत्ययास येते. असे केल्याने विद्यार्थी स्वयंप्रेणेने शिस्तीचे पालन करु शकतील.

**शिक्षण जीवनाशी निगडीत असावे**

पुस्तकी ज्ञानावर भर न देता शिक्षण मुलांच्या संपूर्ण जीवनाशी निगडीत असण्यावर भर दिला जावा असे रविंद्रनाथ टागोरांचे मत बनले होते. कारण त्यांच्या काळात शिक्षण हे साचेबंद व यांत्रिकी स्वरुपाचे झाले होते. शैक्षणिक संस्थेत पर्यायाने शाळेत दिले जाणारे शिक्षण हे पुस्तकी ज्ञानावर आधारित होते. शैक्षणिक संस्थेत पर्यायाने शाळेत दिले जाणारे शिक्षण ह साचेबंद व यांत्रिकी स्वरुपाचे झाले होते. शैक्षणिक संस्थेत पर्यायाने शाळेत दिले जाणारे शिक्षण हे पुस्तकी ज्ञानावर आधारीत होते. असले शिक्षण पुस्तकी ज्ञानावर आधारित असल्याने ते कुचकामी ठरले होते. रविंद्रनाथ टागोर हे रुसोप्रमाणेच निसर्गवादी होते. विषयाचे अध्यापन करीत असतांना प्रत्यक्ष वातावरणानुरुप दिले जावे. मुलांना विषय प्रत्यक्ष परिस्थितीनुसारच शिकविला जावा. म्हणूनच टागोरांना वाटत होते की, शिक्षण जीवनाशी निगडीत असलेले जीवनानुभवी ज्ञान देणे गरजेचे आहे. म्हणून विद्यार्थ्यांच्या जीवनाशी निगडीत असलेले शिक्षण केव्हाही फलदायी ठरु शकते. यासाठी परिस्थितीजन्य निरीक्षणातून अध्यापनाला गती देण्यात यावी यावर रविंद्रनाथ टागोरांचा भरवसासा होता.

**चारित्र्यसंवर्धनासाठी शिक्षण**

रविंदनाथ टागोरांनी चारित्र्यावर अधिक भर दिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शीलास पर्यायाने चारित्र्यास अधिक महत्व दिले. तसेच महात्मा गांधींनी सुध्दा चारित्र्याशी कोणतीच तडजोड केली नाही. म्हणून मुलांचे चारित्र्य संवर्धन करण्यासाठी त्यास योग्य वातावरणात योग्य शिक्षणाची गरज आहे. ज्यामुळे घडविले जाईल असे शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात यावी. यासाठी खुल्या निसर्गरम्य वातावरणाची आवश्यकता असते.

**विद्यार्थ्यांना अध्ययन करतांना शैक्षणिक संस्थेत शोधनाचे व प्रयोग करण्याचे स्वातंत्र्य असावे**

विद्यार्थी शोधन प्रवृत्तीचे असतात. त्यांना वस्तू जाणून घेण्याची उत्सुकता असते. तसेच नवनवे प्रयोग करण्याची आवड असते. म्हणून विद्यार्थ्यांच्या शोधप्रवृत्तीला प्रायोगिक हौस भागविण्यास संपूर्ण स्वातंत्र्य देणे गरजेचे ठरते. शाळेत विद्यार्थ्यांना सहलीस जाण्यास स्वातंत्र्य दिले पाहिजे. अशा प्रकारे विद्यार्थ्यांच्या त्यांच्या बाह्य विचारांपासून परावृत्त करता येते. जेव्हा बालके पर्यटनविषयी विचार करतात आणि त्यांच्या शैक्षणिक कार्याची चर्चा करतात तेव्हा आपली सहल लवकर आणि घाईने व्हावी हा त्यांचा उद्देश नसतो. पण निसर्गात खेळण्याचे, बागडण्याचे, प्रयोग करण्याचे व शोधनाचे स्वातंत्र्य मिळते आणि त्यांचाकल तिकडे वळतो.

**शिक्षण स्वतःस व इतरास ओळखण्यासाठी आहे**

शिक्षण ही सातत्याने चालणारी एक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत शिक्षकाचा मोलाचा वाटा आहे. म्हणून आवश्यक माहिती पुरविणे हे शिक्षकाचे कार्य आहे. सॉक्रेटिसाच्या मते विद्यार्थ्यांना सर्व माहीती शिकवावी पण काहीही सांगू नये यावरून असे निदर्शनास येते की, विद्यार्थी शिक्षणाने स्वतः इतरास ओळखण्यासाठी शिक्षणाचा वापर करतील. शिक्षक

केवळ मार्गदर्शकाची व वाटाड्याची भूमिका बजावतील. शिक्षणापासून बालाकांना आत्मज्ञान होईल. म्हणून माहिती गोळा करण्यासाठी नव्हे तर स्वतःस व इतरास ओळखण्यासाठी शिक्षणाचा वापर झाला पाहिजे असे रविंद्रनाथ टागोरांचे मत होते. अश प्रकारे विद्यार्थ्यांना शिक्षणाविषयी अभिरूची निर्माण होईल व त्यांच्या अंतर्गत सुप्त शक्तीला चालना मिळू शकेल.

**संपूर्ण सृष्टीशी जीवनाचे सामंजस्य प्रस्थापित करण्यासाठी शिक्षण**

रविंद्रनाथ टागोरांनी पर्सनालिटी या पुस्तकात शिक्षणाची माहिती सांगितली आहे. त्यांच्या मते जे संपूर्ण सृष्टीशी आपल्या जीवनाचे सामंजस्य प्रस्थापित करु शकते तेच सर्वोतम शिक्षण होय संपूर्ण सृष्टीचा व्यापक अर्थ म्हणजे चर अचर, सजीव आणि निर्जीव अशा सर्व वस्तूंचा अंतर्भाव असा टागोरांचा दृष्टीकोण दिसतो. याकरीता आपल्यामधील सर्व शक्तिचा सर्व विकास होऊन जर उच्चतम शिखरावर पोचविले तरच चराचरातील वस्तूंशी आपले सामंजस्य प्रस्थापित झाले असे म्हणता येईल.

**रविंद्रनाथ टागोर यांचे शैक्षणिक कार्य**

रविंदनाथ टागोर हे केवळ बोलके शिक्षणतज्ज्ञ नव्हते ते कर्ते शिक्षणतज्ज्ञ नक्कीच होते, हे त्यांच्या शैक्षणिक कार्यावरुन दिसून येते. आधी केले मग सांगितले अशी त्यांची भूमिका होती. त्यातूनच त्यांचे शैक्षणिक कार्य भरीव स्वरुपाचे दिसते. या कार्यास ते शैक्षणिक प्रयोग म्हणतात.

बोलपूर आश्रमाची स्थापना :

कोलकात्यापासून दूर असलेले बोलपूर हे छोटेसे गांव आहे. आपल्या मनःशांतीसाठी देवेंद्रनाथ टागोरांनी येथे १९०१ रोजी ब्रम्हचर्याश्रमाची स्थापना केली. रविंद्रनाथ टागोरांनी त्यास शांतीनिकेतन असे नवे नाव दिले. या शांतीनिकेतन मध्ये रविंदनाथ टागोरांनी आपल्या शैक्षणिक प्रयोगांना साकार करण्याची योजना आखली. येथे आश्रमपध्दतीच्या शिक्षणाची सोय आहे. येथे प्राचीन गुरुकुल पध्दतीचा अवलंब करण्यात येत असे. म्हणून शांतीनिकेतनला प्राचीन गुरुकूल पध्दतीचे अधिष्ठान म्हणून संबोधले जाते. शांतीनिकेतन ही उद्यानशाळा आहे. वर्ग खुल्या वातावरणात भरतात. येथील वातारवण अगदी निसर्गरम्य आहे. अशा वातारवणात बालके झाडाखाली बसून शिकतात. येथे शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवितात. विद्यार्थी आश्रमातील वसतिगृहात राहून एकत्र जेवण घेतात. त्यामुळे येथे स्वावलंबनाचे व श्रमप्रतिष्ठेचे विद्यार्थ्यांना आपोआपच शिक्षण शिक्षण मिळते. येथे संगीत, नाट्य, नृत्य, साहीत्य यांचा अभ्यास केला जात. येथे सर्व शिक्षक आपापल्या कलेत निष्णात असत. सर्व शिक्षण मातृभाषेतून देण्याची व्यवस्था केलेली असते. त्रिभाषा सुत्राचाही वापर कला जातो. पण हिंदी राष्ट्रभाषा म्हणून आणि इंग्रजी परकीय भाषा म्हणून शिवविल्या जात. शाळा हे मुक्तांगण असून पुस्तकी ज्ञानास मुळीच वाव नसतो. तसेच बागकाम पुस्तक बांधणी, सुतारकाम इत्यादी अनेक विषयांचे शिक्षण देण्याची येथे सोय केली जात. कृतीद्वारे शिक्षण या तत्वावर विशेष भर दिला जात असे.

येथील वातावरण नैसर्गिक स्वरुपाचे असे. तेथे कृत्रिमतेला वाव नसे. स्वतंत्र वातावरणाचा विद्यार्थी आणि शिक्षक अनुभव घेत. रविद्रनाथ टागोरांची शाळा ही नैसर्गिक वातावरणातील शाळा आहे. राविंद्रनाथाचे तत्वज्ञान म्हणजे आंतरराष्ट्रीय विश्वबंधुत्व आणि विश्वकुटूंबत्व हे होय. याचा सुरेख संगम पहावयास मिळतो.शांतीनिकेतनच्या वसतिगृहात्मक शाळेत शिशुविभागात वयाच्या दहावर्षापर्यंत, मध्यविभागात वयाच्या दहा ते पंधरापयंत तर आद्यविभागात पंधरा वर्षानंतरचा मुलाचा समावेश होतो. या आश्रमातील वसतिगृहात्मक शाळेत संगीताच्या मधूर सुराने प्रत्येक दिवस उजाडतो. आणि प्रत्येक दिवस मावळतो. तो सुरेश संगीताने.

**विश्वभारती विद्यापीठ**

रविंद्रनाथ टागोरांनी शांतीनिकेतन येथे विश्वभारती नावाचे आंतरराष्ट्रीय विद्यापीठाची स्थापना ६ मे १९२२ रोजी केली. विश्वभारती या शब्दावरून सार्वत्रिक ज्ञान आणि जागतिक संस्कृती याचा अर्थबोध होतो. शांतीनिकेतन आश्रमापासून विश्वभारती विद्यापीठास उद्यास आले. या विद्यापीठात पौर्वात्य व पश्तिमात्य संस्कृतीचा संगम पहावयास मिळतो. विश्वभारती हे आंतरराष्ट्रीय विद्यापीठ म्हणून प्रसिध्द आहे. भारती या शब्दाचा अर्थ संस्कृती असा होतो.

ISSN - 2278-9308

विश्वभारती या शब्दावरून विश्वाच्या संस्कृतीची निर्मिती रविंद्रनाथ टागोरांना करावयाची होती असे या शब्दावरुन ध्वनीत होते.

विश्वभारती विद्यापीठाचे बोधवाक्य यत्र विश्व भवति एक नीडम् असे असून त्याचा अर्थ विश्व जेथे एकत्र येऊन मिळते असे ठिकाण होय. विश्व एक घरटे आहे. असाही त्याचा अर्थबोध होतो. यात वसुधैव कुटूंबकम् ची भावना प्रतीत होते. येथे विभिन्न धर्माच्या व राष्ट्रीयत्वाच्या शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना राहणयाची सोय आहे. वातावरण घरगुती व आध्यात्मिक घरगुती व आध्यात्मिक स्वरुपाचे आहे.

**श्रीनिकेतन**

**रविंद्रनाथ टागोरांनी खेड्याकडे चला या महात्मा गांधीच्या तत्वाचे अनुसरण केलेले दिसते. ग्रामीण भागातील** जनतेचा उद्धार केल्याशिवाय देशाचा उद्धार करणे शक्य नाही. याची जाण रविंद्रनाथ टागोरांना होती. कारण भारत देश अनेक खेडी मिळून बनलेला आहे. म्हणून कोलकात्याजवळ सुरुळ यागावी ६ फेब्रुवारी १९२२ मध्ये श्री निकेतन ची स्थापना केली. ही एक वैशिष्टपूर्ण संस्था आहे. यातील श्री चा अर्थ विकास कल्याण, असा होतो. खेड्यातील जनतेला शिक्षण देऊन तेथील नैसर्गिक साधन सामग्रीचा वापर करुन विकास करणे हे उद्दिष्ट आहे. म्हणून रविंद्रनाथ टागोरांची अशी इच्छा होती की, पूर्ती करणे हे श्रीनिकेतन या शब्दावरुन ध्वनीत होते. रविंद्रनाथ टागोरांची आशा आकांक्षाची पूर्ती करणे हे श्रीनिकेतन या शब्दावरुन ध्वनीत होते. रविंद्रनाथ टागोरांची अशी इच्छा होती की, खेडे हे कल्याणगृह व सौद्र्याचे गृह याचे केंद्र असावे. यात शिक्षण, चर्चा, कृषिविभाग, समाजकार्य विभाग, शिक्षणकार्य चालविले जाते. श्रीनिकेतनचा समावेश विश्वभारती विद्यापीठांतर्गत केलेला आहे.

**रविंद्रनाथ टागोरांच्या शैक्षणिक विचार आणि कार्याचे मूल्यभापन**

रविंद्रनाथ टागोर एक थोर शिक्षणतज्ज्ञ, महान कवी आणि भविष्याचा वेध घेणारे द्रष्टे होते. त्यांनी मांडलेले शिक्षणविषयक विचार वास्तविक व यथार्थ जीवनाशी निगडीत होते. त्यांनी आपल्या शैक्षणिक प्रयोगांसाठी शांतीनिकेतन आणि विश्वभारती विद्यापीठाची तसेच श्रीनिकेतनची स्थापना केली. त्यांनी आदर्शवाद व नैसर्गिकवाद यांचा सुंदर विलोभनीय समन्वय घडूवन आणला. त्यांनी अंधविश्वास, परंपरागत वाईटरुढी, शारीरिक शिक्षा यांना जोरदार विरोध केला होता. त्यातूनच विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य देण्याची कल्पना उदयास आली. निसर्गाकडे चला या शिक्षणपद्धतीचा पुरस्कार केला. शिक्षणात बालकांना स्वातंत्र्य आध्यात्मिक विकास,अध्यापनात स्वयंशिस्त, चारित्र्य संवर्धन इत्यादी बाबींचा पाठपुरावा केला. आंतरराष्ट्रीय सामंजस्य साधण्यासाठी शिक्षणाचा वापर केला. शिक्षण घेत असतानाच बालक स्वावलंबी बनावे याचा पाठपुरावा केला. त्यांनी स्वानुभवाला,कृतिशीलतेला, रचनात्मक प्रवृत्तीला आपल्या शिक्षणाविषयक विचाराने उजाळा दिला होता.

रविंद्रनाथ टागोर हे बोलके शिक्षणज्ज्ञ नव्हते. ते कर्ते शिक्षणतज्ज्ञ होते. आधी केले, मग सांगितले या न्यायानेच त्यांनी कार्य केले. त्यांनी शांतीनिकेतन व विश्वभारत विद्यापीठ स्थापन करुन आपले विचार प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचा आटोकाट प्रयतन केला होता. वसुधैव कुटूंबकम या न्यायाने त्यांनी पौर्वात्य व पाश्चिमात्य संस्कृतीचा समन्वय घडवून आणण्याचा स्तुत्य प्रयत्न केला होता. विश्वभारती विद्यापीठ हे धार्मिक शैक्षणिक, सांस्कृतिक इत्यादींचे विकासाचे केंद्र बनले आहे डॉ एल.बी. मुखर्जीच्या मतानुसार रविंद्रनाथ टागोरआधुनिक भारतातील शैक्षणिक पुनरुत्थान करणारे एक महान शिक्षणतज्ज्ञ होते. प्रचलित शिक्षणपध्दतीत असलेली कृत्रिमता आणि यांत्रिकता नष्ट करण्यासाठी व अध्ययन अध्यापनात नैसर्गिकता आणण्यासाठी रविंद्रनाथ टागोरांनी आपल्या शैक्षणिक विचाराद्वारे प्रयत्न केले. त्यामुळे त्यांचे शैक्षणिक योगदान आजच्या एकविसाव्या शतकातही मार्गदर्शक व प्रेरणादायी वाटतात.

**संदर्भ साधने**


१) जोशी लक्ष्मणशास्त्री संपादक, मराठी विश्वकोष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.

२) घोरमाडे के.यु, घोरमाडे कल, शैक्षणिक विचारवंत, विद्या प्रकाशन नागपूर.

३) चौबे सरयु प्रसाद, भारतीय व पश्चिमात्य शिक्षणशास्त्री, रामप्रसाद और सन्स, आग्रा.

४) पवार ना.ग. शिक्षण क्षेत्रातील विचारवंत, नुतन प्रकाशन, पुणे.